महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये भूमि अभिलेख विभागातील अधिसूचित सेवांचे Governance Process Re-engineering (GPR) अंतर्गत सुलभीकरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२६/ ई-१५२७६९५/भूमापन

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

दिनांक : २६.११.२०२६

वाचा:- १. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील अधिसूचना क्र.भू.३/विनोंक्र.२०५/मलोह अ.२०१५/२०१६,पुणे,दिनांक ४/८/२०१६.

२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील दुरुस्ती अधिसूचना क्र.भू.३/विनोंक्र.२०५/मलोह अ.२०१५/२०१८,पुणे, दिनांक २३/०४/२०१८.

३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील दुरूस्ती अधिसूचना क्र.भू.३/विनोंक्र.२०५/मलोह अ.२०१५/२०१८,पुणे, दिनांक १०/०५/२०१८.

४. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील क्र/एकत्री/ वि.नो.क्र.२३८/१६/E-२९८३५/२०२६ पुणे दि. २१/४/२०२६ रोजीचे दुरुस्ती अधिसूचना क्र. ४

५. नियोजन विभाग, शासन निर्णय, दि.३.८.२०२६

६. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.४.११.२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना :-

मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशांनुसार राज्यामध्ये लोकाभिमुख सेवा अधिक पारदर्शक, सुलभ, कालबद्ध, नागरिकाभिमुख व पूर्णतः डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने नियोजन विभागाच्या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिसूचित सेवा व योजनांचे सुलभीकरण करून सेवा वितरण अधिक परिणामकारक करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत भूमि अभिलेख विभागासाठी संदर्भ क्र.१, २, ३ व ४ अन्वये एकूण २० सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. मा. मुख्यमंत्री सचिवालयाकडून प्राप्त निर्देश व नियोजन विभागाच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे विचारात घेता भूमि अभिलेख विभागामार्फत देण्यात येत असलेल्या अधिसूचित सेवांचे पुनर्विलोकन करून

सेवा प्रक्रियेचे सुलभीकरण, सेवांचे Rationalisation म्हणजेच समान स्वरूपाच्या सेवांचे एकत्रीकरण (Merging), अनावश्यक सेवांचे विलोपन (Denotify), आवश्यक कागदपत्रांची संख्या कमी करणे, अर्जातील Data Entry Fields कमी करणे, सेवा मंजुरी प्रक्रियेतील टप्पे कमी करणे, सेवांचे डिजिटायझेशन करणे, API आधारित प्रणाली एकत्रीकरण करणे तसेच नागरिकांना सेवा अधिक कार्यक्षम व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी विभागामार्फत सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे.

तसेच, नियोजन विभागाच्या दि.३.८.२०२६ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) मान्यता समितीने दि.४.११.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत भूमि अभिलेख विभागाच्या सहा अधिसूचित सेवांच्या सुसूत्रीकरणास व GPR प्रारूपास मान्यता दिली आहे.

सदर बाबी विचारात घेऊन भूमि अभिलेख विभागाच्या अधिसूचित सेवांमध्ये Governance Process Re-engineering (GPR) नुसार सुधारीत कार्यपद्धती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरून शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय -

१. सेवांचे सुसूत्रीकरण (Service Rationalisation) -

भूमि अभिलेख विभागाच्या अधिसूचित केलेल्या एकूण २० सेवांपैकी समान स्वरूपाच्या सेवांचे एकत्रीकरण (Merging), अनावश्यक सेवांचे विलोपन (Denotify) व काही सेवा नव्याने वाढ करुन भूमि अभिलेख विभागाच्या अधिसूचित सेवांची संख्या पुढीलप्रमाणे सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

सेवा प्रकार	GPR पूर्वी सेवा संख्या	GPR नंतर सेवा संख्या
शासन ते नागरिक (G२C), शासन ते शासन (G२G) व शासन ते व्यावसायिक (G२B)	२०	०६

सदर ६ सेवांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.:-

(१) सर्व प्रकारची मोजणी करणे (कार्यवाही पूर्ण करुन मोजणी नकाशाची क प्रत देणे)

(२) आकारफोड / क.जा.प. तयार करणे व नकाशा दुरुस्त करणे

(३) सर्व प्रकारच्या फेरफार नोंदी

(४) ऑनलाईन नसलेले नकाशे/अभिलेख उपलब्ध करुन देणे.

(५) मिळकत पत्रिकेची पोटविभागणी आणि स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे

(६) भूसंपादनामध्ये रस्ता, रस्ता सेट बॅक आणि रिझर्वेशन याबाबत स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे

या सर्व ६ सेवा या G२C, G२B व G२G स्वरूपाच्या सेवा असून त्या विभागामार्फत विकसित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रणालीद्वारे तसेच आवश्यकतेनुसार आपले सरकार व मैत्री पोर्टलशी एकत्रित करून उपलब्ध करून देण्यात येतील.

२. **भूमि अभिलेख विभागामार्फत विलोपित (Denotify) करावयाच्या अधिसूचित सेवांचा तपशील (परिशिष्ट- १)**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील अधिसूचना, दिनांक ४/८/२०१६ येथील अधिसूचनेतील भूमि अभिलेख विभागाकडील अधिसूचित केलेल्या सेवांपैकी वगळण्यात येत असलेल्या सेवांचा तपशील (परिशिष्ट -१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.

३. भूमि अभिलेख विभागामार्फत अधिसूचित केलेल्या सेवांपैकी समान स्वरूपाच्या सेवांचे एकत्रीकरण (Merging) केलेल्या अधिसूचित सेवांचा तपशिल **परिशिष्ट - २** प्रमाणे आहे.

४. भूमि अभिलेख विभागामार्फत नवीन अधिसूचित सेवांचा तपशिल **परिशिष्ट - ३** प्रमाणे आहे.

५. भूमि अभिलेख विभागाच्या अधिसूचित सेवांमध्ये Governance Process Re-engineering (GPR) अंतर्गत देण्यात येत आलेल्या सेवांच्या सुलभीकरणाअंती सुधारित अधिसूचित सेवांचा तपशील, विहित केलेली कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकाऱ्यांचे पदनाम, प्रथम अपील अधिकाऱ्यांचे पदनाम व व्दितीय अपील अधिकाऱ्यांचे पदनाम **परिशिष्ट-४** प्रमाणे आहे.

६. अर्जातील रकान्यांची संख्या कमी करणे, मंजुरी प्रक्रियेतील टप्पे कमी करणे (Minimizing Desk), सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कागदपत्रांची संख्या कमी करणे व सेवा पुरविण्यासाठीची कालमर्यादा सुधारित करणे याबाबतचा तपशील **परिशिष्ट-५** प्रमाणे आहे.

७. भूमि अभिलेख विभागामार्फत नवीन अधिसूचित सेवांकरिता डेस्क संख्या, डेस्कचे पदनाम व डेस्कचे कार्य यांचा तपशिल **परिशिष्ट - ६** प्रमाणे आहे.

८. भूमि अभिलेख विभागामार्फत नवीन अधिसूचित सेवांकरिता आवश्यक कागदपत्रांचा तपशिल **परिशिष्ट - ७** प्रमाणे आहे.

९. मानक कार्यपद्धती (Standard Operating Procedure - SOP) व अंमलबजावणी -

भूमि अभिलेख विभागामार्फत शासन प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering-GPR) अंतर्गत सुधारित करण्यात आलेल्या अधिसूचित सेवांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यक ती मानक कार्यपद्धती (Standard Operating Procedure-SOP), तांत्रिक सूचना, कार्यप्रवाह (Workflow), सेवा वितरणाची पद्धत, प्रणालीतील आवश्यक बदल तसेच प्रशासकीय मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

१०. सेवा वितरणाची ऑनलाइन अंमलबजावणी -

सेवा विकसित व संलग्नित (integrate) करण्याची कार्यवाही ही जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे व महाआयटी यांनी करावी.

११. पूर्वीच्या आदेशांचे अधिक्रमण -

या शासन निर्णयाशी विसंगत असलेले या विषयासंदर्भातील यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय, शासन परिपत्रके, आदेश व मार्गदर्शक सूचना, या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीपुरत्या अधिक्रमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६११२६१५५६४४०७४८ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय बनकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री [नगरविकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)] यांचे सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव.
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
६. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मा. विधान सभा सदस्य व विधान परिषद सदस्य
८. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१०.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१२.महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.विभागीय आयुक्त (सर्व).
१५.जिल्हाधिकारी (सर्व).
१६. भूमापन कार्यासन संग्रहार्थ

परिशिष्ट- १

भूमि अभिलेख विभागामार्फत विलोपित (Denotify) करावयाच्या अधिसूचित सेवांचा तपशील

सेवा क्र.	विद्यमान अधिसूचित सेवा	विलोपित (Denotify) करण्यात येणारी सेवा	कार्यवाही
१)	नक्कल पुरवणे		
	अ) मिळकत पत्रिका	अ) मिळकत पत्रिका	नमूद सेवा या संगणकीकरण, स्कॅनिंग व डिजिटायझेशन पुर्ण होऊन नागरिकांना online उपलब्ध आहेत. सबब वगळण्यात येत आहेत.
	ब)मिळकत पत्रिका मुंबई उपनगर जिल्हा, क्षेत्र पडताळणी करुन	ब)मिळकत पत्रिका मुंबई उपनगर जिल्हा, क्षेत्र पडताळणी करुन	
	क) टिपण, क्षेत्रबुक, प्रतिबुक, शेतपुस्तक, जबाब, फाळणी,काटे,फाळणी, हि.फॉ.नं.४, आकारफोड, स्कीम उतारा, आकारबंद, गटनकाशा, मोजणी नकाशा, क.जा.प. चौकशी नोंदवही इत्यादि अभिलेख	क) टिपण, क्षेत्रबुक, प्रतिबुक, शेतपुस्तक, जबाब, फाळणी,काटे,फाळणी, हि.फॉ.नं.४, आकारफोड, स्कीम उतारा, आकारबंद, गटनकाशा, मोजणी नकाशा, क.जा.प. चौकशी नोंदवही इत्यादि अभिलेख	
	ड) अपील निर्णयाच्या नकला	ड) अपील निर्णयाच्या नकला	

****

परिशिष्ट-२

अधिसूचित केलेल्या सेवांपैकी समान स्वरूपाच्या सेवांचे एकत्रीकरण (Merging) केलेल्या अधिसूचित सेवांचा तपशिल

अ. क्र.	GPR पुर्वीचा लोक़सेवेचा तपशील	GPR नंतरचा लोकसेवेचा तपशील
१	२	३
१	सर्व प्रकाराची मोजणी प्रकरणे	सर्व प्रकारची मोजणी प्रकरणे कार्यवाही पूर्ण करुन मोजणी नकाशाची क प्रत देणे
	अ) मोजणी कार्यवाही पुर्ण करणे	
	i) नियमित प्रकरणे	
	ii) द्रुतगती प्रकरणे	
	ब) मोजणी पूर्ण झाल्यानंतर मोजणी नकाशाची " क " प्रत देणे	
२	आकारफोड / क.जा.प. तयार करणे व नकाशा दुरुस्त करणे	आकारफोड / क.जा.प. तयार करणे व नकाशा दुरुस्त करणे.
	अ) पोटहिस्सा मोजणीनंतर आकारफोड मंजूर करणे	
	ब) बिनशेती प्रकरणात अंतिम अभिन्यास मान्यतेनंतर कमी जास्त पत्रक मंजूर करणे	
	क) भूसंपादन मोजणी प्रकरणात अवार्ड मंजूरीनंतर कमी जास्त पत्रक मंजूर करणे	
	ड) रस्ता सेट बॅक/सामिलीकरण प्रकरणी अंतिम कार्यवाहीअंती नकाशा दुरुस्त करणे	
३	सर्व प्रकारच्या फेरफार नोंदी	सर्व प्रकारच्या फेरफार नोंदी
	अ) विवादग्रस्त नसल्यास	
	ब) दुवा तुटलेली असल्यास फेरफाराबाबत निर्णय घेणे	
	क) रस्ता, रस्ता सेट बॅक, रिझर्वेशन याबाबत संबंधित प्राधिकरणाला जागा हस्तांतरित केलेल्या प्रकरणी संबंधीतांच्या नांवे मिळकत पत्रिकेत नोंद घेणे, (प्रकरणी महानगरपालिका / सक्षम प्राधिकारी यांनी ताबा पावती व संपूर्ण कागदपत्रासह नामांतरासाठी प्रकरण पाठविल्यास)	
	ड) विवादग्रस्त असल्यास	
४	अ) मिळकत पत्रिकेची पोटविभागणी करुन मिळकत पत्रिका स्वतंत्र करणे याबाबत पोटहिस्सा मोजणी पूर्ण झालेल्या दिवसापासून	मिळकत पत्रिकेची पोटविभागणी करुन मिळकत पत्रिका स्वतंत्र करणे
	अ)जिल्हाधिकारी यांनी आदेशित केलेल्या क्षेत्रात तफावत येत नसल्यास पोटहिस्सा मोजणी झाल्यापासून स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे	
	ब) जिल्हाधिकारी यांनी आदेशित केलेल्या पोटहिस्सा क्षेत्रात तफावत येत आहे. मात्र मुळ नगर भूमापनाच्या क्षेत्रात फरक नाही अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी फेरमान्यता दिल्यानंतर स्वतंत्र मि.पत्रिका उघडणे	
५	अ) भूसंपादनामध्ये रस्ता, रस्ता सेट बॅक, रिझर्वेशन याबाबत शासन / संबंधीत प्राधिकारी यांचे नांवे स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे	भूसंपादनामध्ये रस्ता, रस्ता सेट बॅक, रिझर्वेशन याबाबत शासन / संबंधीत प्राधिकारी यांचे नांवे स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे
	अ)ज्याठिकाणी मुळ नगर भूमापनाच्या क्षेत्रात फरक पडत नाही अशा बाबतीत सक्षम प्राधिका-यांचा अंतिम आदेश झालेनंतर मिळकत पत्रिका स्वतंत्र तयार करणे.	
	ब) हस्तांतरण क्षेत्रात फरक पडत असल्यास सक्षम प्राधिका-यांच्या फेरअंतिम आदेशानंतर	

****

परिशिष्ट - ३

भूमि अभिलेख विभागामार्फत नवीन अधिसूचित सेवांचा तपशिल

अ. क्र.	लोकसेवेचा तपशील	प्रस्तावित सुसुत्रीकरण (Proposed Rationalisation)	नवीन प्रस्तावित GPR
१	ऑनलाईन नसलेले अभिलेख नकाशे इत्यादी उपलब्ध करुन देणे	दुरुस्ती/ऑन लाईन उपलब्ध नसलेले अभिलेख/ सक्षम प्राधिकारी यांनी आदेशित केलेली प्रकरणांनूसार अदयावत नकाशा तयार करणे.	ऑनलाईन उपलब्ध नसलेले मूळ अभिलेख, नकाशांचे प्रती, दुरुस्त अभिलेखाचे प्रती, आदेशाचे प्रतीबाबत सेवा अंतर्गत अर्ज प्राप्त झालेस असे अभिलेख Scanning, Digitization, Metadata Entry करुन Digital Database मध्ये समाविष्ट करुन EMahabhumi Portal वर अर्जदारांना उपलब्ध करुन देणे.

****

परिशिष्ट - ४

सेवांच्या सुलभीकरणाअंती सुधारित अधिसूचित सेवांचा तपशील , विहित केलेली कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकाऱ्यांचे पदनाम, प्रथम अपील अधिकाऱ्यांचे पदनाम व व्दितीय अपील अधिकाऱ्यांचे पदनाम

अ. क्र.	लोकसेवेचा तपशील	लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा (दिवस)	पदनिर्देशित अधिकाऱ्यांचे पदनाम	प्रथम अपील अधिकाऱ्यांचे पदनाम	व्दितीय अपील अधिकाऱ्यांचे पदनाम
१	२	३	४	५	६
१	सर्व प्रकारची मोजणी करणे (कार्यवाही पूर्ण करुन मोजणी नकाशाची क प्रत देणे)				
	नियमित/ द्रुतगती प्रकरणे	९०/३० दिवस	उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
२	आकारफोड / क.जा.प. तयार करणे व नकाशा दुरुस्त करणे	१५ दिवस	उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
३	सर्व प्रकारच्या फेरफार नोंदी	२५ दिवस	उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
४	ऑनलाईन नसलेले नकाशे/अभिलेख उपलब्ध करुन देणे	२५ दिवस	उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
५	मिळकत पत्रिकेची पोटविभागणी आणि स्वतंत्र मिळकत	२५ दिवस	उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख
६	भूसंपादन योजनेतील रस्ता, रस्ता सेट बॅक आणि रिझर्वेशन याबाबत स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे	२५ दिवस	उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी	जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख	उपसंचालक भूमि अभिलेख

****

परिशिष्ट-५

लोकसेवे करिता फिल्ड संख्याकागदपत्रांची संख्या डेस्क संख्या आरटीएस कालमर्यादा यांचा तपशिल

अ. क्र.	लोकसेवेचा तपशील	फिल्ड संख्या		कागदपत्रांची संख्या		डेस्क संख्या		आरटीएस कालमर्यादा (दिवसांमध्ये)	
		पूर्व जीपीआर	जीपीआर नंतर	पूर्व जीपीआर	जीपीआर नंतर	पूर्व जीपीआर	जीपीआर नंतर	पूर्व जीपीआर	जीपीआर नंतर
१	सर्व प्रकारया मोजणी प्रकरणी मोजणी कार्यवाही पुर्ण करुन मोजणी नकाशाची "क" प्रत देणे (नियमित/द्रुतगती)	३८	३६	४	०	४	३	१०५/ ४५	९०/ ३०
२	आकारफोड / क.जा.प. तयार करणे व नकाशा दुरुस्त करणे	३०	२६	५	२	५	३	१५	१५
३	सर्व प्रकारच्या फेरफार नोंदी	२१	१६	६	२	३	२	२५	२५
४	ऑनलाईन नसलेले नकाशे /अभिलेख उपलब्ध करुन देणे	-	९	-	०	-	३	-	२५
५	मिळकत पत्रिकेची पोट विभागणी करुन मिळकत पत्रिका स्वतंत्र करणे	२०	१७	५	२	४	२	३०	२५
६	सक्षम प्राधिका-यांचा अंतिम आदेश झालेनंतर भूसंपादनामध्ये रस्ता, रस्ता सेट बॅक, रिझर्वेशन याबाबत शासन / संबंधीत प्राधिकारी यांचे नांवे स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे	२०	१७	५	०	४	२	३०	२५

****

परिशिष्ट - ६

अधिसूचित सेवांकरिता डे स्क संख्या, डेस्कचे पदनाम व डे स्कचे कार्य

अ. क्र.	सेवा	RTS कालमर्यादा (दिवसांमध्ये)	डेस्क संख्या	डेस्क १ - पदनाम	डेस्क १ - कार्य	डेस्क २ - पदनाम	डेस्क २ - कार्य	डेस्क ३ - पदनाम	डेस्क ३ - कार्य	डेस्क ४ - पदनाम	डेस्क ४ - कार्य
१	सर्व प्रकारची मोजणी प्रकरणी मोजणी कार्यवाही पुर्ण करुन मोजणी नकाशाची "क" प्रत देणे (नियमित/द्रुतगती)	९०/ ३०	३	भूकरमापक	मोजणीचा डेटा अपलोड करणे.	शिरस्तेदार	मोजणीच्या तपशिलांची पडताळणी करणे.	उप अधिक्षक भूमि अभिलेख	पडताळणी करून प्रकरण निकाली करणे.	दुरुस्ती लिपिक	केवळ NA (बिनशेती), एकत्रीकरण आणि पोटहिस्सा यांसारख्या विशिष्ट अर्ज प्रकारांसाठी मोजणी डेटामधील बदलांबाबत अहवाल तयार करण्यासाठी लागू.
२	आकारफोड / क.जा.प. तयार करणे व नकाशा दुरुस्त करणे	१५	३	दुरुस्ती लिपिक	भुकरमापकाने तयार केलेल्या हिस्सा नंबर ४ आणि मोजणी नकाशाचा आधारे हिस्सा नमुना क्रमांक ११ व १२ तयार करणे.	शिरस्तेदार	भूमापक आणि दुरुस्ती लिपिक यांनी तयार केलेल्या हिस्सा नमुना क्रमांक ४, ११ व १२ यांची पडताळणी करणे.	उप अधिक्षक भूमि अभिलेख	आकारफोडीस मंजुरी देणे आणि मंजूर तपशील हक्क अभिलेखामध्ये फेरफार / अद्ययावत करण्यासाठी सातबारा विभागाकडे पाठविणे.	--	--
३	सर्व प्रकारच्या फेरफार नोंदी	२५	२	परिरक्षण भूमापक	फेरफार नोंदवहीमध्ये फेरफाराची नोंद स्वीकारून नोंदणी करणे आणि फेरफार नोटीस (नमुना क्रमांक ९) प्रसिद्ध करणे.	उप अधिक्षक भूमि अभिलेख	फेरफार नोंदीची पडताळणी करून प्रमाणित करणे.	--	--	--	--
४	ऑनलाईन नसलेले नकाशे /अभिलेख उपलब्ध करुन देणे	२५	३	प्रतिलिपी लिपिक	अर्ज प्राप्त झाल्याची पोच देणे.	अभिलेखापाल	संबंधित अभिलेख व पूरक कागदपत्रांची पडताळणी करणे.	शिरस्तेदार	पडताळणी केलेल्या अभिलेखांची छाननी करून त्यांना प्रमाणित करणे.	--	--
५	मिळकत पत्रिकेची पोट विभागणी करुन मिळकत पत्रिका स्वतंत्र करणे	२५	२	परिरक्षण भूमापक	अर्जाची पोच देणे व प्राथमिक छाननी करणे.	उप अधिक्षक भूमि अभिलेख	फेरफाराची अंतिम पडताळणी व प्रमाणित करणे.	--	--	--	--
६	सक्षम प्राधिका-यांचा अंतिम आदेश झालेनंतर भूसंपादनामध्ये रस्ता, रस्ता सेट बॅक, रिझर्वेशन याबाबत शासन / संबंधीत प्राधिकारी यांचे नांवे स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे	२५	२	परिरक्षण भूमापक	अर्जाची पोच देणे आणि अर्जाची प्राथमिक तपासणी करणे.	उप अधिक्षक भूमि अभिलेख	फेरफाराची अंतिम तपासणी व प्रमाणीकरण करणे.	--	--	--	--

परिशिष्ट - ७

अधिसूचित सेवांकरिता आवश्यक कागदपत्रांचा तपशिल

अ. क्र.	सेवा	पूर्व जीपीआर		जीपीआर नंतर	शेरा
		दस्तऐवजाचा प्रकार	दस्तऐवजाचे नाव		
१	सर्व प्रकारची मोजणी प्रकरणी मोजणी कार्यवाही पुर्ण करुन मोजणी नकाशाची "क" प्रत देणे (नियमित/द्रुतगती)	फोटो	अर्जदाराचा फोटो	वगळले	अर्जदाराची ओळख आधार प्रमाणीकरण / महा-आयडीद्वारे पडताळण्यात येईल. त्यामुळे स्वतंत्र ओळखपत्र सादर करणे अनिवार्य नाही.
		स्वाक्षरी	स्वाक्षरीची स्कॅन केलेली प्रत.	वगळले	
		ओळखीचा पुरावा (१/९)	पॅन कार्ड	वगळले	
			पासपोर्ट	वगळले	
			आधार कार्ड	वगळले	
			मतदार ओळख पत्र	वगळले	
		पत्त्याचा पुरावा (१/१०)	पासपोर्ट	वगळले	
			पाणीपट्टीची पावती.	वगळले	
			रेशन कार्ड	वगळले	
			आधार कार्ड	वगळले	
			मतदार ओळख पत्र	वगळले	
			टेलिफोन बिल	वगळले	
			ड्रायविंग लायसन्स	वगळले	
			इलेक्ट्रिसिटी बिल	वगळले	
			मालमत्ता कराची पावती	वगळले	
			७/१२ उतारा व ८अ उतारा / भाडे पावती.	वगळले	
२	आकारफोड / क.जा.प. तयार करणे व नकाशा दुरुस्त करणे	ओळखीचा पुरावा (१/४)	पॅन कार्ड	वगळले	अर्जदाराची ओळख आधार प्रमाणीकरण / महा-आयडीद्वारे सत्यापित केली जाईल. त्यामुळे स्वतंत्र ओळखपत्र सादर करण्याची अट अनिवार्य नाही.
			पासपोर्ट	वगळले	
			आधार कार्ड	वगळले	
			मतदार ओळख पत्र	वगळले	
		पूरक दस्तऐवज	सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश.	सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश.	अर्जाच्या प्रकारानुसार ही कागदपत्रे आवश्यक आहेत.
			मोजणीचा नकाशा	मोजणीचा नकाशा	
३	सर्व प्रकारच्या फेरफार नोंदी	ओळखीचा पुरावा (१/४)	पॅन कार्ड	वगळले	अर्जदाराची ओळख आधार प्रमाणीकरण / महा-आयडीद्वारे पडताळण्यात येईल. त्यामुळे स्वतंत्र ओळखपत्र सादर करणे अनिवार्य नाही.
			पासपोर्ट	वगळले	
			आधार कार्ड	वगळले	
			मतदार ओळख पत्र	वगळले	
		पूरक दस्तऐवज	नोंदणीकृत गहाणखताची प्रमाणित प्रत.	नोंदणीकृत गहाणखताची प्रमाणित प्रत.	फेरफाराच्या प्रकाराच्या निवडीनुसार सशर्त अनिवार्य.
			स्वयंघोषणापत्र.	स्वयंघोषणापत्र.	
			इंडेक्स II (मूळ प्रत).	इंडेक्स II (मूळ प्रत).	
			मालमत्ता पत्रक (३ महातील)	मालमत्ता पत्रक (३ महातील)	
			खरेदीखताची छायांकित प्रत.	खरेदीखताची छायांकित प्रत.	
			प्रतिज्ञापत्र किंवा वारस प्रमाणपत्र.	प्रतिज्ञापत्र किंवा वारस प्रमाणपत्र.	
			बक्षीसपत्र (दानपत्र).	बक्षीसपत्र (दानपत्र).	
			बोजा कमी केल्याची प्रमाणित प्रत.	बोजा कमी केल्याची प्रमाणित प्रत.	

अ. क्र.	सेवा	पूर्व जीपीआर		जीपीआर नंतर	शेरा
		दस्तऐवजाचा प्रकार	दस्तऐवजाचे नाव		
			मृत्युपत्र	मृत्युपत्र	
			वाटणीपत्र	वाटणीपत्र	
			न्यायालयाचा आदेश.	न्यायालयाचा आदेश.	
			शासनाचा / सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश.	शासनाचा / सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश.	
			सहकारी संस्था / बँकेचा आदेश.	सहकारी संस्था / बँकेचा आदेश.	
४	ऑनलाईन नसलेले नकाशे /अभिलेख उपलब्ध करुन देणे	ओळखीचा पुरावा (१/४)	-	ओळखपत्र आवश्यक नाही	
५	मिळकत पत्रिकेची पोट विभागणी करुन मिळकत पत्रिका स्वतंत्र करणे	ओळखीचा पुरावा (१/४)	पॅन कार्ड	वगळले	अर्जदाराची ओळख आधार प्रमाणीकरण / महा-आयडीद्वारे सत्यापित केली जाणार असल्याने स्वतंत्र ओळखपत्र सादर करणे अनिवार्य नाही.
			पासपोर्ट	वगळले	
			आधार कार्ड	वगळले	
			मतदार ओळख पत्र	वगळले	
		पूरक दस्तऐवज - पोटहिस्सा संबंधित कागदपत्र.	पोटहिस्सा / भूसंपादन मोजणी नकाशा.	पोटहिस्सा / भूसंपादन मोजणी नकाशा.	अर्जाच्या प्रकारानुसार सशर्त अनिवार्य.
			संबंधित प्राधिकरणाच्या नावे मालकी हक्क हस्तांतरन दस्त.	संबंधित प्राधिकरणाच्या नावे मालकी हक्क हस्तांतरित करणे.	
			मंजूर अभिन्यास	मंजूर अभिन्यास	
			भूसंपादन निवाड्याची प्रत.	भूसंपादन निवाड्याची प्रत.	
			ताबा पावती.	ताबा पावती.	
६	सक्षम प्राधिका-यांचा अंतिम आदेश झालेनंतर भूसंपादनामध्ये रस्ता, रस्ता सेट बॅक, रिझर्वेशन याबाबत शासन / संबंधीत प्राधिकारी यांचे नांवे स्वतंत्र मिळकत पत्रिका तयार करणे	ओळखीचा पुरावा (१/४)	पॅन कार्ड	वगळले	अर्जदाराची ओळख आधार प्रमाणीकरण / महा-आयडीद्वारे पडताळली जाणार असल्याने स्वतंत्र ओळखपत्र सादर करणे अनिवार्य नाही.
			पासपोर्ट	वगळले	
			आधार कार्ड	वगळले	
			मतदार ओळख पत्र	वगळले	